# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 22.01.2026** **वार- गुरुवार**

---

**महापौर आरक्षण**

राज्यातल्या 29 महानगरपालिकांच्या महापौरपदासाठी आज आरक्षण सोडत जाहीर झाली. मंत्रालयात नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीत महापालिकांच्या आरक्षणाची सोडत काढण्यात आली. या सोडतीत पुणे महापालिकेतील महापौर पद सर्वसाधारण खुल्या वर्गातील महिला उमेदवारासाठी तर पिंपरी चिंचवडचं महापौरपद सर्वसाधारण खुल्या वर्गासाठी राखीव झालं आहे.

**सामंजस्य करार**

दावोस मध्ये सुरु असलेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र शासन, रुरल एन्हान्सर्स ग्रुप आणि न्यूट्रीफ्रेश फार्म टेक इंडिया यांच्यात सुमारे 2,500 कोटींचा सामंजस्य करार करण्यात आला. या सामंजस्य करारामुळे महाराष्ट्रात आधुनिक, हवामान-संवेदनशील आणि तंत्रज्ञानाधारित स्मार्ट शेतीला चालना मिळणार आहे. गणेश निकम आणि संकेत मेहता यांनी 2019 मध्ये पुण्यात स्थापन केलेल्या न्यूट्रीफ्रेश फार्म टेक इंडिया कंपनीनं 2028 पर्यंत 2,000 एकर क्षेत्रात विस्तार करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

**राष्ट्रीय कार्यशाळा**

हवामान बदलाच्या काळात जलसंधारणाचं अचूक नियोजन करण्यासाठी 'डेटा'ची विश्वासार्हता अत्यंत महत्त्वाची असून त्यासाठी आधुनिक सेन्सर्सचा वापर करणे ही काळाची गरज आहे, असं प्रतिपादन जलशक्ती मंत्रालयाचे सचिव व्ही. एल. कांता राव यांनी केलं. ते आज पुण्यात प्रि -सिसेन्स 2026 या राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. हायड्रोमेट्रिक आणि हवामानशास्त्रीय उपकरणांची अचूकता, त्यांचे परीक्षण आणि कॅलिब्रेशन" हा कार्यशाळेचा मुख्य विषय होता . ही कार्यशाळा ,जल क्षेत्रातल्या डेटाची गुणवत्ता सुधारण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे.

**बजाज पुणेग्रँड टूर**

बजाज पुणे ग्रँड टूर आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेच्या तिसऱ्या टप्प्याला आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत सुरुवात झाली. शाळेच्या मुलांनी केलेलं शिवराज्याभिषेकाचं सादरीकरण आणि सासवडकरांच्या घोषणा आणि उत्स्फूर्त प्रतिसादानं वातावरण बारावून गेलं होतं. एकंदर 137 किलोमीटर लांबीचा हा टप्पा सासवड ते बारामतीतल्या विद्या प्रतिष्ठान दरम्यान पार पडला. स्पर्धेच्या तिसऱ्या टप्प्यातही चीनच्या 'ली निंग स्टार' संघानं आपला दबदबा कायम राखला. या संघाचा ऑस्ट्रेलियन सायकलपटू स्कॉट कॅमेरॉन विजेता ठरला तर ग्रीसचा बोग्लास जॉर्जस आणि बेल्जियमच डुपाँट टीमोथी हे दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानी राहिले.

या स्पर्धेचा चौथा आणि अंतिम टप्पा उद्या  बालेवाडी ते बालगंधर्व रंगमंदिर या मार्गावर होईल. याची सुरुवात दुपारी दीड वाजता श्री शिव छत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे, बालेवाडी इथून होणार आहे. एकंदर 99 किलोमीटर 15 मीटर अंतराच्या या स्पर्धेत नागरिकांना देश-परदेशातल्या  सायकलपटूचे कौशल्य बघण्याची संधी मिळणार आहे. या स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर उद्या पुणे शहर आणि परिसरातील प्रमुख रस्त्यांवरील वाहतुकीत बदल करण्यात आला आहे.

**माघीगणेश जयंती उत्सव**

माघी गणेश जयंती उत्सव आज पुणे आणि परिसरात भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात येत आहे. पुण्यात दगडूशेठ गणपती मंदिरात आज दुपारी 12 वाजता सुवर्ण पाळण्यात गणेश जन्माचा सोहळा पार पडला. सारस बाग इथल्या गणपती मंदिरातही विविध धार्मिक कार्यक्रमांसह ,वार्षिक उत्सवाचं आयोजन करण्यात आलं होतं. उत्सवानिमित्त शहरातल्या ठिकठिकाणच्या गणेश मंदिरांवर फुलांची सजावट आणि विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

**पुष्प प्रदर्शन**

पुण्यातल्या ऐतिहासिक वारसा असलेल्या एम्प्रेस गार्डनमध्ये उद्यापासून पुष्प प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं आहे. यंदाचं प्रदर्शन ज्येष्ठ पर्यावरण तज्ञ पद्मभूषण डॉ. माधव गाडगीळ यांना समर्पित करण्यात आलं आहे. प्रदर्शनाचं उद्घाटन उद्या सकाळी पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते होणार आहे.

**पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव**

24 व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा समारोप आज बालगंधर्व रंगमंदिर इथं होत आहे. राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यावेळी उपस्थित राहणार आहेत. यावेळी भारतीय चित्रपटसृष्टीतील योगदानाबद्दल ज्येष्ठ अभिनेते बिस्वजित चॅटर्जी, ज्येष्ठ अभिनेत्री फरीदा जलाल आणि ज्येष्ठ अभिनेत्री आशा काळे यांना ‘पीफ डिस्टींग्वीश अ‍ॅवार्ड’, तर ज्येष्ठ व्हायोलिन वादक आणि संगीतकार अमर हलदीपूर यांना संगीत क्षेत्रातील योगदानासाठी संगीतकार एस. डी. बर्मन आंतरराष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

**किल्ले जिंजी दर्शन कार्यशाळा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या 50 विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी आज तामिळनाडूतल्या जागतिक वारसा दर्जा असलेल्या किल्ले जिंजी दर्शन कार्यशाळेसाठी प्रस्थान केलं. या कार्यशाळेत किल्ले जिंजीचे ऐतिहासिक महत्त्व, लष्करी आणि  राजकीय योगदान, महाराष्ट्राशी असलेले ऐतिहासिक नाते, पर्यटन आणि  व्यापारी दृष्टिकोनातून असलेली भूमिका यांचा सखोल अभ्यास करण्यात येणार आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**